# MARATHI (LL)

## MARATHI (LL)

## BOARD'S ACTIVITY SHEET (MARCH 2021)

**Time : 3 Hours]** **[Total Marks : 80**

[ **NOTE :** This examination was not conducted due to Covid-19.]

# MARATHI (LL)

## BOARD'S ACTIVITY SHEET (SEPTEMBER 2021)

**(With Solution)**

**Time : 3 Hours]** **[Total Marks : 80**

**सूचना :** *(1) सूचनांनुसार आकलनकृती व व्याकरण यांमधील आकृत्या काढाव्यात.*

*(2) आकृत्या पेननेच काढाव्यात.*

*(3) उपयोजित लेखनातील कृतींसाठी (सूचना, निवेदन) आकृतीची आवश्यकता नाही. तसेच या कृती लिहून घेऊ नयेत.*

*(4) विभाग 5 – उपयोजित लेखन प्र. 5. (अ) (2) सारांशलेखन या घटकासाठी गद्य विभागातील प्र. 1. (इ) अपठित उतारा वाचून त्या उताऱ्याचा सारांश लिहावा.*

*(5) स्वच्छता, नीटनेटकेपणा व लेखननियमांनुसार लेखन यांकडे जाणीवपूर्वक लक्ष द्यावे.*


---

## विभाग 1 : गद्य

### पठित गद्य

**प्र. 1. (अ) उताऱ्याच्या आधारे सूचनांनुसार कृती करा :**


**(1) आकृतिबंध पूर्ण करा :** 2




एके दिवशी शाळेत त्यांनी एक प्रयोग करून दाखवला. भिंगाच्या साहाय्यानं सूर्यकिरणांची शक्ती कागदावर एकत्र केल्यास कागद जळतो हे त्यांनी दाखवलं आणि माझ्याकडे बघून ते म्हणाले, ''माशेलकर, तुमची ऊर्जाशक्ती एकत्र करा, काहीही जाळता येईल.'' एकीकडे मला एकाग्रतेचा मंत्र मिळाला आणि दुसरीकडे विज्ञान समजलं.

आयुष्याचं फार मोठं तत्त्वज्ञान मला भावे सरांच्या या शिकवणुकीतून गवसलं. त्यांना मी कसा विसरू शकेन? भावे सरांप्रमाणेच माझ्या शालेय आणि पुढील शैक्षणिक जीवनात जोशी सर, शिर्के सर, श्री. मालेगाववाला या सर्वांनीच माझ्या व्यक्तिमत्त्वाच्या जडणघडणीसाठी उत्तम मार्गदर्शन केलं, संस्कार केले. आयुष्याच्या उभारणीसाठी मला याच शाळेने आणि याच शिक्षकांनी भरपूर शिदोरी दिली. संघर्षासाठी आत्मविश्वास मिळवून दिला. जगण्याचे भान दिले. आजही फिरून ते शाळेचे दिवस आठवताना एकीकडे प्रचंड दारिद्र्याचा सामना करतानाचे क्षण न् क्षण आठवतात आणि त्याचवेळी माझी आई, माझे शिक्षक, माझी शाळा हे 'माझे संस्कार केंद्र' डोळ्यांसमोर उभे राहते. मी पुन्हा मनोमनी शाळेत जाऊ लागतो.

**(2) आकृतिबंध पूर्ण करा :** 2





**(3) स्वमत :** 3

'भावे सरांचे शब्द हीच खरी माशेलकरांची ऊर्जा', या विधानाचा तुम्हांला समजलेला अर्थ लिहा.

**प्र. 1. (आ) उताऱ्याच्या आधारे सूचनांनुसार कृती करा :**

**(1) आकृतिबंध पूर्ण करा :** 2




निरंजनची गुरुजींवर अपार श्रद्धा होती. तसं गुरुजींचंही निरंजनवर खूप प्रेम होतं. तो त्यांचा लाडका विद्यार्थी होता, कारण तो अतिशय प्रामाणिकपणे काम करायचा आणि अभ्यासही. या जगात त्याचं असं कुणी नव्हतंच. दूरदूरच्या नात्यातल्या एका मावशीच्या घरी चिपळूण शहरालगतच्या एका उपनगरात तो राहायचा. गावापासून दूर डोंगराच्या पायथ्याशी हे मावशीचं घर होतं. आईवडील लहानपणीच वारले. काही दिवस मामाने सांभाळ केला आणि मग कामासाठी म्हणून चिपळूणला आणलं. या मावशीकडे आणून सोडलं आणि तोही मुंबईला निघून गेला तो कायमचाच. जाताना मोलाचा सल्ला मात्र देऊन गेला – 'रडत बसू नको. शेण, गोठा वगैरे जी पडतील ती सारी कामं कर. मावशी देईल ते खा आणि इथंच राहा. मावशी तुला शाळेतही घालणार आहे.'

मामा गेला तो पुन्हा परतला नाही मात्र लहानगा निरंजन मावशीच्या घरी प्रामाणिकपणे काम करायचा. घरातल्या सर्वांशी त्याने जमवून घेतलं आणि शाळेत नाव दाखल केलं. मावशीची परिस्थिती यथातथाच असल्याने निरंजन वार लावून जेवायचा.

**(2) कारणे लिहा :** 2

(i) निरंजन हा गुरुजींचा लाडका विद्यार्थी होता; कारण – --------------

(ii) निरंजन वार लावून जेवायचा; कारण – --------------


**(3) स्वमत :** 3

'निरंजन खरा नागरिक' हे पाठाधारे तुमच्या शब्दांत स्पष्ट करा.

## अपठित गद्य

**प्र. 1. (इ) उताऱ्याच्या आधारे सूचनांनुसार कृती करा :**

**(1) आकृतिबंध पूर्ण करा :** 2



‘श्यामची आई’ हे बोधप्रद पुस्तक आहे. ते आपल्याला आदर्शाची शिकवण देते. स्वार्थत्याग, प्रामाणिकपणा, बंधुभाव, निगर्वीपणा अशा सद्‌गुणांचा बोध आपल्या अंत:करणावर बिंबवते. खरा मोठेपणा कशात असतो, ते सांगते. श्याम म्हणतो, ‘‘मोठेपणा याचा अर्थ जगातील काही व्यक्तींच्या ओठांवर आपले नाव काही काळ नाचणे, असा मी करीत नाही. हिमालयाच्या दऱ्याखोऱ्यात असे प्रचंड गगनचुंबी वृक्ष असतील की ज्यांची नावे जगाला माहीत नाहीत. रानावनांतील कानाकोपऱ्यात असे एखादे रमणीय व सुगंधी फूल फुललेले असेल की ज्याचा पत्ता कोणाला लागत नाही.’’ ‘मी निर्दोष होत आहे, हळूहळू उन्नत होत आहे’ अशा उत्तुंग विचारांनी ही कादंबरी तुडुंब भरलेली असल्यामुळे मला ती फार आवडते.

**(2) कृती करा :** 2

**कादंबरीतील उत्तुंग विचार** → [ ] , [ ]

**विभाग 2 : पद्य**

**प्र. 2. (अ) कवितेच्या आधारे सूचनांनुसार कृती करा :**

**(1) चौकटी पूर्ण करा :** 2

(i) जेथे दृष्टी पोहोचते असे ठिकाण – [ ]

(ii) कवयित्रीच्या मते जपायची गोष्ट – [ ]

फुलाफुलांचे दाट ताटवे, जिथे पोचते दृष्टी
रंग मजेचे, रंग उद्याचे, जपून ठेवू सृष्टी...
धान्य देईना संगणक हा, काळी आई जगवू
मातीमध्ये जे हात राबती, तयांस देऊ पुष्टी...
रंग मजेचे, रंग उद्याचे

उधळू, फेकू बिया डोंगरी, रुजतील देशी झाडे
गच्च माजतील राने, होईल आभाळातून वृष्टी...
रंग मजेचे, रंग उद्याचे

डोंगरातून वाहात येते, खळाळते हे पाणी
फेनधवलशा तुषारांमध्ये, राहाल कैसे कष्टी?
रंग मजेचे, रंग उद्याचे

मिळेल पैसा, मिळेल दौलत, यंत्रांच्या संगती
आभाळाच्या छत्राखाली, एक अनोखी तुष्टी...
रंग मजेचे, रंग उद्याचे

हिरवी हिरवी मने भोवती, किती छटा हिरव्याच्या
गर्भरेशमी सळसळण्याच्या जगास सांगू गोष्टी...
रंग मजेचे, रंग उद्याचे

**(2) कवितेच्या आधारे पाऊस पडण्याच्या चक्राचा ओघतक्ता तयार करा :** **2**

**डोंगरावर बिया उधळणे**

↓

------------------------

↓

------------------------

↓

आभाळातून वृष्टी होणे

**(3) पुढील शब्दांचा अर्थ लिहा :** **2**

(i) वृष्टी —

(ii) फेनधवलशा —

(iii) अनोखी —

(iv) तुष्टी —

**(4) काव्यसौंदर्य :** **2**

वसुंधरेचे हिरवेपण जपण्यासाठी उपाय सुचवा.

**प्र. 2. (आ) पुढील दोन कवितांपैकी कोणत्याही एका कवितेसंबंधी दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे कृती सोडवा :**

| मुद्दे | 'हिरवंगार झाडासारखं' *किंवा* 'स्वप्न करू साकार' | | |
|---|---|---|---|
| (1) प्रस्तुत कवितेचे कवी/कवयित्री — | | | (1) |
| (2) प्रस्तुत कवितेचा विषय — | | | (1) |
| (3) प्रस्तुत ओळींचा सरळ अर्थ लिहा — | 'पक्षी झाडांचे कुणीच नसतात तरीही झाड त्यांचं असतं' | 'हजार आम्ही एकी बळकट सर्वांचे हो एकच मनगट' | (2) |
| (4) प्रस्तुत कवितेतून मिळणारा संदेश — | | | (2) |
| (5) प्रस्तुत कविता आवडण्याचे वा न आवडण्याचे कारण — | | | (2) |

## विभाग 3 : स्थूलवाचन

**प्र. 3. पुढीलपैकी *कोणत्याही दोन* कृती लिहा :** **6**

**(1)** 'आधी केले मग सांगितले', या उक्तीची यथार्थता 'मोठे होत असलेल्या मुलांनो...' या पाठाच्या आधारे स्पष्ट करा.

**(2)** सूर्य आणि पणती या प्रतीकांचा तुम्हांला समजलेला अर्थ 'जाता अस्ताला' या कवितेच्या आधारे सविस्तर लिहा.

(3) पुढील मुद्द्यांवर एक परिच्छेद तयार करा :

व्युत्पत्ती कोश
- निर्मितीचा ठराव
- निर्मितीची जबाबदारी
- निर्मितीसाठी अर्थसाहाय्य
- त्याचे प्रकाशन

## विभाग 4 : भाषाभ्यास

**प्र. 4. (अ) व्याकरण घटकांवर आधारित कृती :**

**(1) पुढील वाक्यांचा प्रकार ओळखा :** **2**

(i) किती सुंदर आहे ताजमहाल!  (ii) प्रवासात भरभरून बोलावे.

**(2) कंसांतील सूचनांनुसार वाक्यरूपांतर करा :** **2**

(i) त्यांना मी कसा विसरू शकेन? *(विधानार्थी करा.)*

(ii) मुलांनी रांगेत चालावे. *(आज्ञार्थी करा.)*

**(3) पुढील वाक्प्रचारांचा अर्थ सांगून वाक्यांत उपयोग करा :** *(कोणतेही दोन)* **4**

(i) झोकून देणे  (ii) तथ्य असणे  (iii) सुरुंग लावणे.

**प्र. 4. (आ) भाषिक घटकांवर आधारित कृती :**

**(1) शब्दसंपत्ती :**

**(i) समानार्थी शब्द लिहा :** **1**

(1) आयुष्य =

(2) नदी =

**(ii) विरुद्धार्थी शब्द लिहा :** **1**

(1) स्तुती ×

(2) शक्य ×

**(iii) शब्दसमूहाबद्दल एक शब्द लिहा :** **1**

पायात चप्पल न घालता – ☐

**(iv) वचन बदला :** **1**

(1) टोपली – ---------------  (2) काटा – ---------------

**(2) लेखननियमांनुसार लेखन :**

- **पुढील वाक्ये लेखननियमांनुसार लिहा :** **2**

(i) त्या बाळाला आधि शालीत गूंडाळ.

(ii) वाघिण पिल्लांच्या सूरक्षेबद्दल दक्ष असते.

(3) **विरामचिन्हे :**

- **पुढील विरामचिन्हांची नावे लिहा :** 2

| विरामचिन्हे | | नावे |
|---|---|---|
| (i) | ? | |
| (ii) | . | |
| (iii) | ! | |
| (iv) | ‘ ’ | |

## विभाग 5 : उपयोजित लेखन

**प्र. 5. (अ) पुढील कृती सोडवा :**

(1) **पत्रलेखन :** 6

‘बालविद्यामंदिर’, शिरवळ, खंडाळा द्वारे आयोजित
आंतरशालेय वक्तृत्व स्पर्धा
1 ऑगस्ट स. 11 वाजता
balvidyamandir.78@gmail.com

अभय/अभया पाटकर, विद्यार्थी प्रतिनिधी,
विद्याभवन हायस्कूल, खंडाळा या नात्याने

वक्तृत्व स्पर्धेत सहभागी करून घेण्याची विनंती करणारे पत्र बालविद्यामंदिर शाळेच्या मुख्याध्यापकांना लिहा.

***किंवा***

वक्तृत्व स्पर्धेतील प्रथम पारितोषिकप्राप्त स्पर्धक सुजय/स्मिता साठे यांना अभिनंदन करणारे पत्र लिहा.

***किंवा***

(2) **सारांशलेखन :** 6

विभाग 1 – गद्य (इ) (प्र. क्र. 1 – इ) मधील अपठित उताऱ्याचा 1/3 एवढा सारांश तुमच्या शब्दांत लिहा.

**प्र. 5. (आ) पुढीलपैकी *कोणत्याही* दोन कृती सोडवा :**

(1) **जाहिरातलेखन :** 5

- **पुढील विषयावर आकर्षक जाहिरात तयार करा :**

‘भव्य पुस्तक प्रदर्शन व सवलतीच्या दरात विक्री.’

**(2) बातमीलेखन :** 5

- **पुढील निवेदन वाचून बातमी तयार करा :**

> ‘झाडे लावा, पृथ्वी वाचवा’
> ‘निसर्ग’ संस्था, गोरेगाव
> आयोजित
> ‘वृक्षारोपण कार्यक्रम’
> स्थळ—आरे कॉलनी, गोरेगाव
> दि. 5 जून स. 10 वाजता

**(3) कथालेखन :** 5

- **पुढील मुद्द्यांच्या आधारे कथा लिहा :**

**मुद्दे :** एक शिकारी — शेतात जाळे — कबुतरांचा थवा — शेतातील दाणे टिपणे — जाळ्यात अडकणे — प्रमुखाचा सल्ला — ‘जाळे घेऊन उडा’ — कबुतरांचे जाळ्यासह उड्डाण — बोध.

**प्र. 5. (इ) पुढील लेखनप्रकारांपैकी *कोणतीही एक* कृती सोडवा :** 8


**(1) प्रसंगलेखन :**

> नंदादीप विद्यालय, सोलापूर
> ‘वार्षिक क्रीडा महोत्सव’
> दि. 10 जानेवारी, सकाळी 10 वाजता
> प्रमुख पाहुणे – श्री. अमर राजे

वरील प्रसंगी तुम्ही उपस्थित होतात अशी कल्पना करून प्रसंगलेखन करा.

**(2) आत्मकथन :**

दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे चौकटीतील घटकाचे आत्मकथन लिहा :




**(3) वैचारिक लेखन :**

‘पाण्याचे महत्त्व’ या विषयावर तुमचे विचार मांडा.

---

# SOLUTION : BOARD'S ACTIVITY SHEET (SEPTEMBER 2021)

**प्र. 1. (अ)**

**(1)** **लेखक डॉ. रघुनाथ माशेलकर यांचे शिक्षक**
- भावे सर
- जोशी सर
- शिर्के सर
- मालेगाववाला सर

**(2)** **भावे सरांच्या प्रयोगाचे लेखकाला झालेले फायदे**
- एकाग्रतेचा मंत्र मिळाला.
- विज्ञान समजले.

**(3)** माशेलकरांचे लहानपण फार गरिबीत गेले. फीचे पैसे नसणे, उत्तरपत्रिका आणण्यासाठी पैसे नसणे, पाठकोरे कागद वापरणे, तुटक्या पेन्सिलीने लिहिणे अशा वाईट परिस्थितीत त्यांचे शिक्षण होत होते. त्यांच्या आईचे खूप कष्ट व शिकवण्याची जिद्द त्यांना मिळत होती. त्याचबरोबर त्यांची शाळा व शाळेतील शिक्षक यांनी त्यांचे व्यक्तिमत्त्व घडवले. भावे सरांनी केवळ शास्त्र शिकवले नाही, तर विषयाची गोडी लावली व जीवनाचे मोठे तत्त्वज्ञान शिकवले. भिंगाच्या मदतीने सूर्यकिरणे एकवटून त्यांनी कागद जाळण्याचा प्रयोग केला नि त्या वेळी लेखकांना 'माशेलकर, तुमची ऊर्जाशक्ती एकत्र करा, काहीही जाळता येईल' हा एकाग्रतेचा मंत्र दिला. या शब्दांनी माशेलकरांची ऊर्जा जागृत झाली. उच्चतम शिक्षण घेऊन ते जगातील थोर शास्त्रज्ञ झाले. म्हणजेच भावे सरांचे शब्द हीच खरी माशेलकरांची ऊर्जा होती.

**प्र. 1. (आ)**

**(1)** **निरंजनच्या मावशीच्या घराची वैशिष्ट्ये**
- गावापासून दूर
- डोंगराच्या पायथ्याशी

**(2)** (i) निरंजन हा गुरुजींचा लाडका विद्यार्थी होता; कारण तो अतिशय प्रामाणिकपणे काम आणि अभ्यासही करायचा.

(ii) निरंजन वार लावून जेवायचा; कारण त्याच्या मावशीची परिस्थिती यथातथाच होती.

**(3)** निरंजन हा खूप मेहनती आणि अभ्यासू मुलगा होता. आईवडील वारल्यावर तो मावशीकडे राहत होता. तो गुणी मुलगा असल्यामुळे गुरुजींचा लाडका विद्यार्थी होता. निरंजनच्या मनातही गुरूंबद्दल खूप श्रद्धा होती. अशा या सद्गुणी निरंजनचा नागरिकशास्त्राचा शेवटचा पेपर होता. त्या दिवशी त्याला रेल्वे रुळांशी घातपाताच्या खुणा

दिसल्या. त्याने तत्परतेने या घातपाताची माहिती स्टेशनमास्तरांना दिली. त्याने परीक्षा न देता किंवा वैयक्तिक स्वार्थ न पाहता एका नागरिकाचे कर्तव्य पार पाडले. त्याच्या या चांगल्या कृत्यामुळे भयंकर अपघात टळला आणि हजारो लोकांचे प्राण वाचले. निरंजनने हे कृत्य सन्मान मिळावा म्हणून केले नव्हते; तर त्याने एका जबाबदार नागरिकाची कामगिरी केली; म्हणून 'निरंजन खरा नागरिक आहे' असे म्हणायला हवे.

**प्र. 1. (इ)**

**(1)** **'श्यामची आई' हे पुस्तक पुढील सद्‌गुण बिंबवते**

- स्वार्थत्याग
- प्रामाणिकपणा
- बंधुभाव
- निगर्वीपणा

**(2)** **कादंबरीतील उत्तुंग विचार**

- मी निर्दोष होत आहे.
- हळूहळू उन्नत होत आहे.

**प्र. 2. (अ)**

**(1)** (i) फुलाफुलांचे दाट ताटवे

(ii) सृष्टी

**(2)**

डोंगरावर बिया उधळणे

↓

झाडे रुजणे

↓

राने माजणे

↓

आभाळातून वृष्टी होणे

**(3)** (i) वृष्टी — पाऊस

(ii) फेनधवलशा — फेसाप्रमाणे पांढऱ्या

(iii) अनोखी — वेगळी/निराळी

(iv) तुष्टी — समाधान/तृप्ती

**(4)** आपण ज्या पृथ्वीवर राहतो, ती आपली माता आहे. ती संपन्न व समृद्ध राहावी, यासाठी पृथ्वीची काळजी घेणे हे आपले कर्तव्य आहे. प्रचंड जंगलतोडीमुळे जंगले भकास झाली आहेत. त्यामुळे पाऊस पडत नाही. कोरड्या दुष्काळाचे संकट पृथ्वीवर सतत येत असते. म्हणून पृथ्वीला उजाड होण्यापासून वाचवण्यासाठी 'झाडे लावा : झाडे जगवा' ही मोहीम त्वरित राबवणे आवश्यक आहे. पृथ्वीला वाचवणे हे प्रत्येक नागरिकाचे प्रथम कर्तव्य आहे. पाणी वाया दवडणे, पाण्याचा गैरवापर करणे चुकीचे आहे. तसेच वायू प्रदूषण व जल प्रदूषण यांना आळा घालणे आवश्यक आहे. पृथ्वी हिरवीगार करणे, हाच पृथ्वीला वाचवण्याचा एकमेव उपाय आहे.

**प्र. 2. (आ) हिरवंगार झाडासारखं**

**(1) प्रस्तुत कवितेचे कवी →** जॉर्ज लोपीस.

**(2) प्रस्तुत कवितेचा विषय →** माणसाने आपले आयुष्य झाडासारखे जगावे, हे सूत्र या कवितेतून मांडले आहे.

**(3) कवितेतील ओळींचा सरळ अर्थ लिहा →**

झाडाच्या अंतरंगाविषयी सांगताना कवी म्हणतो – झाडावर पक्षी येतात, विश्रांतीला थोडा वेळ थांबतात; निघून जातात. पक्ष्यांची झाडाशी मैत्री नसते. तरीही झाड मात्र पक्ष्यांचेच असते.

**(4) प्रस्तुत कवितेतून मिळणारा संदेश →**

कवी जॉर्ज लोपीस यांची मुक्तछंदात लिहिलेली ही कविता आहे. झाडाचे महत्त्व, झाडाची सहनशीलता, परोपकारी वृत्ती, संकटात ठाम उभे राहण्याची जिद्द या गुणांचे महत्त्व या कवितेतून जाणवते. माणसाने झाडासारखे प्रसन्न व हिरवेगार असावे अशी शिकवण ही कविता देते.

**(5) प्रस्तुत कविता आवडण्याचे वा न आवडण्याचे कारण →**

'झाड' हा निसर्गाचा एक घटक आहे. झाडाची परोपकारी वृत्ती, अविचल वृत्ती, दानशूरता, आनंदी वृत्ती हे गुण मानवाने घ्यावेत, असे ही कविता सांगते. विविध गुणांनी संपन्न असलेल्या वृक्षासारखे तुम्ही व्हा, हे सहजपणे सांगणारी ही कविता मला आवडते. सोपेपणाने शिकवण देण्याची ताकद या कवितेमध्ये आहे.

***किंवा***

**स्वप्न करू साकार**

**(1) प्रस्तुत कवितेचे कवी →** किशोर पाठक.

**(2) प्रस्तुत कवितेचा विषय →**

देशाच्या उज्ज्वल भविष्याचे स्वप्न या कवितेत रेखाटले आहे.

**(3) प्रस्तुत कवितेतील ओळींचा सरळ अर्थ →**

आम्ही भारतीय हजारो, लाखोंच्या संख्येने असलो, तरी आमची एकजूट मजबूत आहे. सर्वांची ताकद एकाच मनगटात आहे.

**(4) प्रस्तुत कवितेतून मिळणारा संदेश →**

या देशभक्तीपर गीतात देशाची कृषिसंस्कृती, श्रमप्रतिष्ठा, एकात्मतेचे सामर्थ्य या मूल्यांचे महत्त्व सांगितले आहे. भारतीयांचा या मातीवरती हक्क आहे आणि नव्या पिढीचे व नव्या युगाचे स्वप्न साकार करणे या कर्तव्याची जाणीव करून दिली आहे.

**(5) कविता आवडण्याचे वा न आवडण्याचे कारण →**

या देशभक्तीपर गीतात नव्या पिढीचे व नव्या युगाचे स्वप्न साकार करण्यासाठी कवीने मार्गदर्शन केले आहे. हे करताना कृषिसंस्कृती, श्रमप्रतिष्ठा, एकात्मतेचे सामर्थ्य या मूल्यांचा पुरस्कार केला आहे. नवीन पिढीसाठी नवी स्वप्ने साकार करण्याचा विचार मांडणारी ही कविता मला आवडली.

**प्र. 3.**

(1) समर्थ रामदासांचे असे सुवचन आहे की 'आधी केले मग सांगितले!' यातून फार मोठा मोलाचा संदेश संत रामदासांनी दिला आहे. आपल्याला एक वाईट सवय असते, ती म्हणजे आपली कामे दुसऱ्यांनी करावीत. आपल्या आळशी प्रवृत्तीतून 'दे रे हरी। खाटल्यावरी' अशी भावना तयार होणे गैर आहे. आपण परावलंबी न होता, स्वत:ची कामे स्वत: करण्याची जिद्द आपल्यात असायला हवी. आपण स्वत: आपली कामे करण्यात कुशल असलो, की आपण आपले उदाहरण दुसऱ्यांना दाखवू शकतो. स्वावलंबी होऊन आपली कामे आपण केली की दुसऱ्यांनाही विश्वास वाटतो. मग आपण दुसऱ्यांसाठी आदर्श (आयडॉल) होतो. यालाच 'आधी केले, मग सांगितले' असे म्हणतात.

(2) 'जाता अस्ताला' या कवितेमध्ये सूर्य व पणती ही दोन्हीही प्रतीके तेजाची आहेत. सूर्य हे तेजाचे नैसर्गिक प्रतीक आहे. तर पणती हे मानवनिर्मित प्रतीक आहे. लाखो वर्षे सूर्यगोल हा आकाशात तळपत आहे नि तो या पृथ्वीवरील चराचराला ऊर्जा, प्रकाश व चैतन्य सतत देत आहे. सूर्यप्रकाशामुळे मानवी जीवन फुलले आहे. सूर्याने मानवी तनामनाला कायम उजळत ठेवले आहे. पणती हे सूर्याचे मूल आहे. ते महाप्रचंड तेजाचे छोटेसे रूप आहे. स्वत:च्या क्षमतेनुसार पणतीही अंधार दूर करण्याचे कार्य करीत आहे. सूर्य अस्ताला गेल्यानंतर मानवी जीवन उजळत ठेवण्याचे व्रत पणतीने घेतले आहे. त्यामुळे सूर्याइतकाच तिचाही त्याग महत्त्वाचा आहे. या दोन्ही प्रतीकांतून 'स्वत: जळत राहून जगाला प्रकाश देण्याचा' संदेश आपणांस मिळतो. मनात सेवाभाव ठेवून कार्य करण्याची शिकवण ही कविता देते.

(3) **व्युत्पत्ती कोश :** एखाद्या शब्दाबद्दलचे कुतूहल शमवण्यासाठी आपण व्युत्पत्ती कोशाची मदत घेतो. व्युत्पत्ती कोशात आपल्याला मूळ शब्द कसा, केव्हा, कुठे निर्माण झाला हे तर कळतेच; परंतु अन्य भाषांत तो शब्द कसा आला आहे व कोणत्या रूपात आहे, हेही कळते. असा हा शब्दांचा जादूगार कसा अस्तित्वात आला हे समजून घेणे उद्बोधक ठरेल. १९३८ साली मुंबई येथे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन भरले होते. स्वातंत्र्यवीर सावरकर हे या संमेलनाचे अध्यक्ष होते. त्यांच्या अध्यक्षतेखाली 'व्युत्पत्ती कोश रचनेचे कार्य हाती घ्यावे' असा ठराव या संमेलनात मंजूर करण्यात आला. कृ. पां. कुलकर्णी यांच्यावर संपादनाची जबाबदारी सोपवण्यात आली. बॅ. मुकुंदराव जयकर यांनी पैशांची मदत केली आणि श्री. दाजीसाहेब तुळजापूरकर यांनी पुरस्कृत केल्यामुळे निर्मितीस भरीव मदत झाली. अखेर १९४६ साली मराठी व्युत्पत्ती कोशाचे पहिले प्रकाशन झाले.

**प्र. 4. (अ)**

**(1)** (i) उद्‌गारार्थी वाक्य (ii) विधानार्थी वाक्य.

**(2)** (i) विधानार्थी वाक्य – त्यांना मी विसरू शकणार नाही.

(ii) आज्ञार्थी वाक्य – मुलांनो, रांगेत चाला.

**(3)** (i) झोकून देणे – **अर्थ :** पूर्णपणे सहभागी होणे.

**वाक्य :** पुष्करने महाविद्यालयीन शिक्षणानंतर स्वत:ला नाटकात झोकून दिले.

(ii) तथ्य असणे – **अर्थ :** सत्यता असणे.

**वाक्य :** राधाच्या बोलण्यात तथ्य होते.

(iii) सुरुंग लावणे – **अर्थ :** एखादा बेत उधळून लावणे.

**वाक्य :** मुलांच्या सिनेमाला जाण्याच्या योजनेला बाबांनी सुरुंग लावला.

**प्र. 4. (आ)**

**(1)** **(i)** (1) आयुष्य = जीवन

(2) नदी = सरिता

**(ii)** (1) स्तुती × निंदा

(2) शक्य × अशक्य

**(iii)** पायात चप्पल न घालता – अनवाणी

**(iv)** (1) टोपली – टोपल्या (2) काटा – काटे

**(2)** (i) त्या बाळाला आधी शालीत गुंडाळ.

(ii) वाघीण पिल्लांच्या सुरक्षेबद्दल दक्ष असते.

**(3)**

| | विरामचिन्हे | नावे |
|---|---|---|
| (i) | ? | प्रश्नचिन्ह |
| (ii) | . | पूर्णविराम |
| (iii) | ! | उद्गारवाचकचिन्ह |
| (iv) | ‘ ’ | एकेरी अवतरणचिन्ह |

**प्र. 5. (अ), (आ), (इ)...**

**उपयोजित लेखनातील कृतींच्या स्वयं-मूल्यमापनाबाबत...**

उपयोजित लेखनाच्या कृतींमध्ये विद्यार्थ्यांनी उत्तरे लिहिताना स्वत:चे विचार, स्वत:च्या कल्पना स्वभाषेत लिहाव्यात, अशी अपेक्षा आहे. या कृतींची उत्तरे मुक्तोत्तरी स्वरूपाची असतात. विद्यार्थ्यांनी ही उत्तरे स्वत: लिहावीत.

**‘नवनीत सराव प्रश्नपत्रिका (कृतिपत्रिका)’** या पुस्तकात या विषयातील सोडवून दिलेल्या पहिल्या कृतिपत्रिकेतील उपयोजित लेखनामधील कृतींची उत्तरे विद्यार्थ्यांनी अभ्यासावीत; गुणदान-पद्धतीतील मुद्दे विचारात घ्यावेत आणि स्वत: लिहिलेली उत्तरे स्वत:च तपासण्याचा प्रयत्न करावा. गरजेनुसार आपल्या शिक्षकांचे मार्गदर्शनही घ्यावे.

**उपयोजित लेखनाच्या अधिक अभ्यासासाठी**

***‘नवनीत मराठी (LL) उपयोजित लेखन : इयत्ता दहावी’***

***या पुस्तकात दिलेले उपयोजित लेखनाचे नमुने अवश्य वाचावेत.***

---

* * *